**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रभाकर रंगनाथ कुलकर्णी
अ, गणेश पार्क, फ्लॅट क्र.४,
माणिकबाग, सिंहगड रोड, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
(प्रशासन), जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यासन अधिकारी(प्रशासन),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४५४ / पुणे /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रभाकर रंगनाथ कुलकर्णी
अ, गणेश पार्क, फ्लॅट क्र.४,
माणिकबाग, सिंहगड रोड, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
(प्रशासन), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.डी.बी.मुंढे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यासन अधिकारी(प्रशासन),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री.आर.बी.माहिंगडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.१२.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.१.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.३.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मा.उच्च न्यायालय,मुंबई यांच्या दि.४ एप्रिल १९९१ च्या निकालानुसार १९८६-८७ ची तात्पुरत्या ज्यष्ठता यादीस अंतिम स्वरुप १९९१ एप्रिल नंतर केव्हा व कोणत्या आदेशाने /क्रमांकाने प्रसिध्द करण्यात आली त्याची प्रत | |

## विवेचन

कनिष्ठ सहाय्यक पदावरील कर्मचाऱ्यांच्या १९८६ पासूनच्या अंतिम स्वरुपात प्रसिध्द केलेल्या ज्येष्ठता यादीची मागणी अपीलकर्ता श्री.प्रभाकर रंगनाथ कुलकर्णी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविलेले शुल्क श्री.कुलकर्णी यांनी भरले नाही व अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय कायम करुन अपील निकाली काढले, त्याविरुध्द श्री.कुलकर्णी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सेवाज्येष्ठतेत आपल्यावर अन्याय झाला असून तो दूर व्हावा व त्या अनुषंगाने सेवाज्येष्ठता यादीत दुरुस्ती करुन मिळावी, अशी श्री.कुलकर्णी यांची मूळ मागणी आहे. त्याबाबत ते सातत्याने विविध पातळीवर पत्रव्यवहार करीत आले आहेत. जून १९९७ पासून आपण वरिष्ठ सहाय्यक या पदावर कार्यरत होतो व दि.३.१०.१९९४ रोजी सेवानिवृत्त झालो. सन १९८६ ची तात्पुरती ज्येष्ठता यादी मिळताच नियमातील तरतुदीनुसार आपण हरकती घेतल्या होत्या. त्याचे निरसन करणे व १९८६ ची ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणे हे मुख्य कार्यकारी अधिकारी, सोलापूर यांच्यावर बंधनकारक असतानाही त्यांनी ती निश्चित केलेली नाही. आपल्याला कनिष्ठतम असणारांना पदोन्नती देण्यात आली, परंतु आपल्याला ज्येष्ठतेनुसार

सेवासवलती मिळाल्या नाहीत. त्यामुळे आपल्याला आर्थिक व मानसिक त्रास झाला, असे श्री.कुलकर्णी यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. या तक्रारीच्या अनुषंगाने ज्येष्ठतायाद्यांसह विविध कागदपत्रांची मागणी श्री.कुलकर्णी यांनी केली आहे. उपलब्ध माहितीसाठी शुल्क भरण्याचे कळवूनही आपण शुल्क का भरले नाही, याचा खुलासा श्री.कुलकर्णी यांनी केलेला नाही. तसेच अपिलीय प्राधिकारी यांनी ठेवलेल्या सुनावणीची तारीख आपल्याला मुदतीत मिळाली नाही, असे श्री.कुलकर्णी यांनी सांगितले.

श्री.कुलकर्णी यांनी आपल्या मागणी संदर्भात उच्च न्यायालयात रीट दाखल केले होते. सन १९८६ ची ज्येष्ठतायादी अंतिम केली नसल्यास लवकरात लवकर ती करावी, असा निर्णय देऊन उच्च न्यायालयाने श्री.कुलकर्णी यांचा अर्ज ४.४.१९९१ रोजी फेटाळला. उच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार १९८६ च्या ज्येष्ठता यादीला अंतिम स्वरुप केव्हा देण्यात आले व ती केव्हा प्रसिध्द करण्यात आली, याची माहिती श्री.कुलकर्णी यांनी मागितली होती. मागील सेवा ग्राह्य धरण्याची श्री.कुलकर्णी यांची विनंती उच्च न्यायालयाने अमान्य केल्याचा अहवाल शासनाला सादर करण्यात आला असून त्यामुळे १९८६ ची तात्पुरती सेवाज्येष्ठता यादी दुरुस्त केली नाही. उच्च न्यायालयाने अपीलकर्त्याच्या बाजूने निर्णय न दिल्याने न्यायालयाच्या आदेशानुसार सन १९८६-८७ ची ज्येष्ठता यादी प्रसिध्द करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही, असे तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी दि.७.३.२००६ च्या निकालपत्रात म्हटले आहे. ‘श्री.कुलकर्णी यानी त्यांचे सेवाज्येष्ठतायाद्यांबाबत दि.२५.१०.१९८८ च्या अर्जान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार नोंदविली होती. सदर तक्रारी अर्जावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उच्च न्यायालय यांना अहवाल सादर केलेला होता. त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात आली आहे. श्री.कुलकर्णी यांनी नियमातील तरतुदीनुसार त्यांच्या सेवाज्येष्ठता याद्याबाबत त्या त्या वेळी योग्य त्या अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अपील करणे गरजेचे होते, परंतु त्यांनी तसे केले नाही,’ असे विद्यमान उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री.डी.बी.मुंढे यांनी दि.२०.२.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे. १९८६ ची सेवाज्येष्ठता यादी वगळता

१९९५ पर्यंतच्या याद्यांना अंतिम स्वरुप देण्यात आले असल्याचे व १९८६ ची ज्येष्ठता यादी अंतिम स्वरुपात अद्याप प्रसिध्द करण्यात आली नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी (प्रशासन), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.आर.बी.माहिंगडे यांनी सांगितले.

सन १९९५ पर्यंतच्या ज्येष्ठता याद्यांना अंतिम स्वरुप देऊन त्या प्रसिध्द करण्यात आल्या असतानाही केवळ एकाच वर्षाची-सन १९८६ ची ज्येष्ठता यादी अंतिम स्वरुप देऊन प्रसिध्द केली गेली नाही, हे उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यावरुन स्पष्ट होते. मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाचा हवाला तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) यांनी आपल्या दि.२०.२.२००८ च्या निर्णयात दिला असला तरी त्यामुळे सेवाज्येष्ठता यादीला अंतिम स्वरुप देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही, हे त्यांचे विधान निराधार आहे. ज्येष्ठता यादीला लवकरात लवकर अंतिम स्वरुप देण्याची सूचना उच्च न्यायालयाने दि.४.४.१९९१ च्या आदेशात केली आहे. एप्रिल १९९१ पासून मार्च २००८ पर्यंत म्हणजे १७ वर्षे ज्येष्ठता यादीला अंतिम स्वरुप दिलेले नाही 'लवकरात लवकर' (as early as possible) याचा अर्थ जिल्हा परिषद प्रशासनाने कसा घेतला आहे, हे त्यावरुन स्पष्ट होते. श्री.कुलकर्णी यांनी सेवाज्येष्ठतायादीबाबत त्या त्या वेळी योग्य त्या अपील अधिकाऱ्याकडे अपील करणे गरजेचे होते, असे श्री.मुंढे यांनी त्यांच्या दि.२०.२.२००८ च्या निवेदनात म्हटले आहे. त्यांनी नियमानुसार कार्यवाही करावयास हवी होती, असे सांगतानाच उपमुख्य कार्यकारी अधिकारी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीबाबत मात्र स्पष्टीकरण देत नाहीत, हे पारदर्शकतेचे लक्षण नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उच्च न्यायालयाला सादर केलेल्या अहवालाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात आली आहे, असे त्यांनी म्हटले आहे, म्हणजे नेमके काय केले, याची माहिती अपीलकर्त्याला दिली जाणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी आपण दोन्ही नव्याने पदभार घेतला असून सन १९८६ च्या अंतिम ज्येष्ठता यादीबाबत उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पूर्तता करुन एक महिन्यात आयोगाला अहवाल सादर करण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी श्री.आर.बी.माहिंगडे व अपिलीय प्राधिकारी श्री.डी.बी.मुंढे यांनी आयोगाला विनंतीपूर्वक सादर केले. मात्र वारंवार स्मरण करुनही आपल्याला काहीही कळविले गेलेले नाही, असे लेखी निवेदन श्री.कुलकर्णी

यांनी दि.२५.३.२००८ रोजी आयोगाला पाठविले. दि.३.५.२००८ रोजी आयोगाने उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री.डी.बी.मुंढे यांना अहवाल सादर करण्याबाबतची जाणीव पत्राद्वारे दिली, परंतु त्यांबाबतही त्यांनी अहवाल सादर केलेला नाही, आयोग याची गंभीर दखल घेत आहे. हा अहवाल त्वरित सादर न झाल्यास ते पुढील कारवाईस पात्र राहतील.

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) सन १९८६ च्या ज्येष्ठता यादीला अंतिम स्वरुप देऊन या यादीच्या प्रसिध्दीबाबतची कार्यवाही करुन दि.२०.३.२००८ पर्यंत अहवाल सादर करण्याच्या आदेशाची जन माहिती अधिकारी यांनी पूर्तता केली नाही, यास्तव त्यांना शास्ती का करण्यात येऊ नये, याबाबतचा त्यांचा स्वयंस्पष्ट अहवाल व अपिलीय प्राधिकारी यांनीही अद्याप अहवालाची पूर्तता केली नसल्याने त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई का करु नये, याबाबतचा त्यांचा अहवाल हा आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसात आयोगाला सादर करावा. अशी पूर्तता न झाल्यास शास्ती व शिस्तभंगाची कारवाई करण्यात येइल.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१०.९.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.वसंतराव मुगुटराव जाधव
द्वारा प्रकाश जाधव
जाधव हॉस्पीटल, शिक्रापूर, ता.शिरुर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४९० / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.वसंतराव मुगुटराव जाधव
द्वारा प्रकाश जाधव
जाधव हॉस्पिटल, शिक्रापूर, ता.शिरुर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे प्रतिनिधी श्री.सु.अ.भावसार

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे श्री.काशिनाथ जगन्नाथ मदने

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.११.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.१२.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.१२.२००५ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.११.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मौजे सासवड, ता.पुरंदर येथील मिळकत सि.स.नं.३९२४ च्या उताऱ्यावर अनंतराव मुगुटराव जाधव अशी नोंद केली त्याऐवजी वसंत मुगुटराव जाधव अशी नोंद होणेबाबत. | |

## विवेचन

पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास महामंडळ, पुणे यांच्याकडून आपण खरेदी केलेल्या सदनिकेच्या सिटी सर्व्हे क्र.३९२४ च्या उताऱ्यावर श्री.वसंतराव मुगुटराव जाधव यांच्याऐवजी श्री.अनंतराव मुगुटराव जाधव असे नाव भूमी अभिलेख कार्यालयाने चुकून नोंदवले. त्याबाबतच्या दुरुस्त नावाची नोंद का झालेली नाही, याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.वसंतराव मुगुटराव जाधव यांनी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, सासवड, ता.पुरंदर यांच्याकडे मागितली होती. याबाबत अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे यांच्याकडे अपील दाखल करावे लागेल, तदनंतर नावात दुरुस्तीची उचित कार्यवाही नियमानुसार करता येईल, असे जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, सासवड, ता.पुरंदर यांनी श्री.जाधव यांना कळविले व माहितीबाबत शुल्क भरण्यास सांगितले. त्याविरुध्द श्री.जाधव यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे यांच्याकडे अपील केले. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ अन्वये केलेला हा अर्ज असून शासनाच्या अभिलेखात असलेली माहिती पुरविण्याच्या तरतुदीनुसार ती देण्यात आलेली आहे. कार्यवाहीचा समावेश माहितीच्या

व्याख्येत होत नाही असे नमूद करुन अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे यांनी अपील फेटाळले. त्याविरुध्द श्री.जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपण घेतलेल्या सदनिकेला चुकीचे नाव नगरभूमापन कार्यालयाकडील उताऱ्यामध्ये लावले गेले आहे. त्याबाबत पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाकडील दप्तरी नोंद, सासवड नगरपालिकेकडील नोंद या कागदपत्रांसह आपण मुख्याधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास महामंडळ यांच्याकडे अर्ज केला त्यानुसार मिळकत व्यवस्थापक, पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास महामंडळ यांनी नगर भूमापन अधिकारी यांचे कार्यालय सासवड, तालुका पुरंदर यांना दि.२०.१०.२००५ रोजी पत्र पाठविले व दि.१.२.१९८४ पासून आजपर्यंत श्री.वसंतराव मुगुटराव जाधव हेच या गाळ्याचे लाभार्थी आहेत. आपल्या दप्तरी नजरचुकीने श्री.अनंतराव मुगुटराव जाधव असे नाव लागलेले आहे, तरी त्याऐवजी श्री.वसंतराव मुगुटराव जाधव अशी दुरुस्ती करण्यात यावी, असे त्यांना या पत्राद्वारे कळविले. तरीही अद्याप दुरुस्ती झालेली नाही असे श्री.जाधव यांनी प्रतिपादन केले. प्रथम अपिलाच्या निर्णयात नव्या दुरुस्तीबाबतची प्रक्रिया स्पष्ट केलेली आहे, परंतु श्री.जाधव यांनी त्याप्रमाणे पूर्तता केलेली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, सासवड, ता.पुरंदर यांनी नमूद केले. त्यानुसार आपण अर्ज देऊ, असे श्री.जाधव यांनी सागितले व त्यानंतर एक महिन्यात योग्य ती दुरुस्ती करुन माहिती दिली जाईल, असे अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.सु.अ.भावसार व जन माहिती अधिकारी श्री.काशिनाथ जगन्नाथ मदने यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले.

श्री.जाधव यांनी आयोगाकडे केलेला पत्रव्यवहार व संबधित कागदपत्रे यातील त्यांच्या सह्या वेगवेगळ्या आहेत. ही बाब गंभीर आहे. याबाबतचा खुलासा अपीलकर्त्याने करणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

(१) अपील अमान्य.

(२) अपीलकर्ता यांना दुरुस्ती करुन माहिती दिल्याचा अहवाल अधीक्षक भूमी अभिलेख, पुणे यांनी त्वरित सादर करावा.

(३) अपीलकर्ता श्री.वसंतराव मुगुटराव जाधव यांनी सह्यांमधील फरकाबाबतचा खुलासा मूळ सही दर्शविणाऱ्या साक्षांकित कागदपत्रांसह आठ दिवसांत आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.८.९.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४९६+ ५९२ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री किसन मल्लिकार्जून कनकुरे<br>रा. १५१/२९४,२९५ लक्ष्मीनगर,<br>लक्ष्मीपेठ, जि. सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | वरिष्ठ अधिकारी<br>व्यापारी सहकारी बँक मर्या. सोलापूर,<br>४५२, मंगळवार पेठ,जि. सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था,<br>पुणे विभाग, पुणे, साखर संकुल,<br>शिवाजीनगर, पुणे | हजर |

'व्यापारी सहकारी बँक मर्यादित, सोलापूर' ने संचालक मंडळाच्या दि. २९.०४.२००६ च्या बैठकीत ठराव करून अंदाजे १५ ते १९ कर्मचा-यांना बढती (पदोन्नती) दिलेली आहे. त्या सर्व कर्मचा-यांच्या बढतीपूर्वीच्या व नंतर मिळणा-या वेतनासबंधी सविस्तर अहवाल व सदर बढती कोणत्या निकषाने/ नियमाने करण्यात आली आहे, या बद्दल स्पष्टीकरणासहीत सविस्तर अहवालाची सत्यप्रत अपीलकर्ता श्री. कनकुरे यांनी जन माहिती अधिकारी, व्यापारी सहकारी बँक यांच्याकडे मागितली होती. आपल्या बँकेला भरीव शासकीय अर्थसहाय्य नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही, असे बँकेने श्री. कनकुरे यांना कळविले. त्याविरूध्द श्री. कनकुरे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे, यांच्याकडे अपील केले. शासनाच्या उद्योग विभाग कार्यालयाकडून सोलापुरातील सदरहू नागरी सहकारी बँकेमार्फत एकूण १३ कर्जदारांना लाभ दिला असून ती रक्कम एकूण

रू. २६,७६,४४१/- इतकी आहे. कर्जदारांना लाभ दिल्याने बँकेचे तेवढया रकमेचे कर्ज वसूल झाले असून अप्रत्यक्षरीत्या बँकेस शासनाची आर्थिक मदत झाली आहे, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी यांनी दिला व सात दिवसांत माहिती देण्याचा आदेश दि १०.१०.२००६ रोजी दिला परंतु अद्यापपर्यंत अपीलकर्त्यास माहिती दिलेली नसल्याचे अपिलकर्त्याने नमूद केले. माहिती सात दिवसात देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी कबूल केले. निर्णयाचा खुलासा मागणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. मात्र बँकेला हा अधिनियम लागू होतो, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी यांनी दिल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी जवळ जवळ दोन वर्ष होत आले तरी माहिती दिलेली नाही. त्यामुळे ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचा आदेश पुढील प्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशत: मान्य.
२. जन माहिती अधिकारी यांनी या आदेशाच्या दिनांकापासून आठ दिवसात परिपूर्ण माहिती देउन परिपूर्ती अहवाल आयोगास सादर करावा.
३. माहिती देण्यास केलेली टाळाटाळ व विलंब याबद्दल शास्ती का करू नये, याविषयीचा लेखी खुलासा हा आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसात जन माहिती अधिकारी श्री एल. पी. चंडक यांनी आयोगास सादर करावा. त्यानंतर त्याविषयी निर्णय घेतला जाईल.

पुणे

दि.१७.१०.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**


राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१


राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २७.५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४० / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. राजेंद्र विश्वनाथ शिंदे<br>फ्लॅट क्र.३०३, बिल्डिंग क्र.८, रक्षकनगर,<br>फेज-२, नगर बायपास रोड, खराडी, पुणे-१४ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | माहिती अधिकारी, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व महाराष्ट्र शासनाचे छायाचित्रण तज्ञ, पुणे-१ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | प्र. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे १ | हजर |

अपीलकर्ता श्री. राजेंद्र विश्वनाथ शिंदे यांनी दि. ९.९.२००६ चे अर्जान्वये प्रमुख लिपिक पदसाठी असणारे आर.आर., वरिष्ठ लिपिक पदावरील ज्येष्ठता क्रमांक मिळण्याविषयी माहिती मागितली होती. हीच माहिती श्री. शिंदे वारंवार मागत असून वेळोवेळी ती त्यांना देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे यांनी दि. ९.१०.२००६ चे पत्रान्वये नमूद केले. तसेच परिपूर्ण माहिती दि.२७.५.२००८ रोजी मिळाली असून आता काही तक्रार राहिली नसल्याचे अपीलकर्त्याने नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** १२.९.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. दत्तात्रय बंडू जगताप
२०, विजय को. ऑप हौसिंग सोसायटी,
१३२ए/१, शिवाजीनगर, पुणे-१६ — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी**
सहकार आयुक्त यांचे कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी**
उप निबंधक, सहकारी संस्था, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४३ / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.१०.२००६ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>मागासवर्गीयाकरीता शासनाने सादर केलेल्या घरबांधणी योजने संबंधित अटी व शर्तींची माहिती. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. दत्तात्रय बंडू जगताप यांनी शासनाच्या मागासवर्गीयांसाठी असलेल्या घरबांधणी योजनेच्या अटी व शर्ती संबंधित माहिती मागितली होती.

मागितलेली माहिती न मिळाल्याने श्री. जगताप यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील न करता थेट राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. दरम्यानच्या काळात अपीलकर्त्याचे निधन

झाल्याचे अन्य प्रकरणात (अपील क्र.४२३/पुणे ) जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, सहकार आयुक्त यांचे कार्यालय, पुणे-१ यांनी आयोगास दि. २७.५.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २३.९.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १८.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्रमांक | ५५३ + ५६६ + ५६७ + ५६८ / पुणे |
|---|---|---|
| १ | अपीलकर्ता | ॲड. दौलत वि. मोरे<br>रा. मु.पिंपरे खुर्द, पो.निरा, ता.पुरंदर, जि. पुणे |
| २ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार, फलटण, ता. फलटण, जि. सातारा |
| ३ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार, फलटण, ता. फलटण, जि. सातारा |

| अपील क्रमांक | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|
| ५५३ / पुणे | मा.अ./एस.आर./६६/२००६ दि. १७.८.२००६ रोजी लिहिलेले त्यात दि.२१.८.२००६ पूर्वी रू.१६/- चलनाने भरणा करावेत, न भरल्यास सदर तारखेचा (दि.२१.८.०६ चा ) अर्ज निकाली ठेवणेत आला आहे, असे समजणेत यावे, असे नमूद केले आहे. सदर दि. १७.८.२००६ रोजीचे पत्र दि. १९.८.२००६ रोजी मिळाले व दि. २०.८.२००६ रोजी रविवार आहे. ही कार्यवाही अशी का केली, याबाबतची माहिती | अपीलकर्ता गैरहजर. अपीलकर्त्यास शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात आली आहे. मूळ विषयाच्या अनुषंगाने आयोगाने अपील क्र.२१ /२००८ (दि.८.५.२००८ ) रोजी निर्णय दिलेला आहे. |
| ५६६ / पुणे | मौजे राजाळे, ता. फलटण येथील गट नंबर ७०१/१ व ७०१/२ मधील फेरफार क्र.५३०४ हा तलाठ्यांनी का नोंदला, झेरॉक्स प्रतीत का दिला | अपीलकर्ता गैरहजर. प्रमाणित नकला मिळाव्यात, अशी मागणी केली नसल्याने झेरॉक्स प्रती दिल्याचे जन माहिती अधिकारी यांचे दि. ७.९.२००६ चे निवेदन |
| ५६७ /पुणे | दि. २२.५.२००३ रोजी मौजे राजाळे, ता. फलटण येथील जमीन गट क्र.७०१, क्षेत्र ५ हे. ८८ आर चा सन २०००-०१, २००१-०२ चा ७/१२ उतारा, गाव कामगार तलाठी, राजाळे यांनी दिला. सदर ७/१२ उतारा सातारा येथील दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात रे.दि.मु. क्र. ८५/२००३ या दाव्यात दाखल केला असून, त्याला निशाणी १२ पडलेला आहे. सदर ७/१२ खरा आहे की खोटा आहे, याची माहिती | अपीलकर्ता गैरहजर. माहिती दिली असल्याचे जन माहिती अधिकारी यांचे दि. ७.९.२००६ रोजीचे निवेदन |

| | | |
|---|---|---|
| ५६८/पुणे | दि. २०.६.२००६ रोजी मौजे राजाळे, ता.फलटण येथील गट क्र.७०१/१ चा ७/१२ उतारा घेतला असता त्यावर कसणाऱ्याचे नाव या सदरात गाव न.नं.७ब वरून पाठविला अशी नोंद आहे. त्या अहवालाची सर्टिफाईड नक्कल मागितली असता उत्तर दिले. गाव न.नं.७ब अस्तित्वात नाही, त्याबाबत माहिती | अपीलकर्ता गैरहजर. माहिती दिली आहे, असे जन माहिती अधिकारी यांचे दि. ७.९.२००६ रोजीचे निवेदन |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. वर नमूद केलेली अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

२. याच विषयासंबंधी अपीलकर्ता अनेक अर्ज, अपिले करीत असल्याचे कागदपत्रांवरून दिसून येते. त्याच त्याच विषयाबाबत पुन:पुन्हा अर्ज व अपिले न करण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे

**पुणे**
**दि. ११ .९.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. श्रीमंत राजाराम हुलेनवर
मु. न्यू इंग्लिश स्कूल, कोसारी,
ता. जत, जि. सांगली

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी**
मुख्याध्यापक, न्यू इंग्लिश स्कूल, कोसारी,
ता. जत, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५६३ / सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.११.२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.१२.२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>माहे मे २००७ ते माहे डिसेंबर २००७ या हजेरी पत्रकावर सही बंद केली व पगार बंद केला याबाबत माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. श्रीमंत राजाराम हुलेनवर यांनी माहे मे २००७ ते माहे डिसेंबर २००७ या कालावधीत पगार व हजेरी पत्रकावर सही बंद करण्यात आली असून त्याबाबत कार्यवाही होत नसल्याचे नमूद केले आहे. कोणती 'माहिती' हवी असल्याचे स्पष्टपणे नोंदविलेले नाही.

अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीशी निगडीत आहे. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. मात्र त्यांचा पगार व हजेरीपत्रकावरील सह्या या संदर्भातील वस्तुस्थितीची कारणांसह माहिती त्यांना दिली गेली पाहिजे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. श्री. हुलेनवर यांचा पगार व हजेरीपत्रकावरील सह्या बंद करण्याबाबतच्या कारणांसह माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, न्यू इंग्लिश स्कूल कोसारी, ता. जत, जि. सांगली यांनी हा आदेश मिळाल्यापासून एक आठवड्यात देऊन त्याबाबत आयोगाला अहवाल सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.०९.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१९.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५८२/ सोलापूर | उपस्थिती |
| २ | **अपीलकर्ता** | श्री. नितीन अरूण काळे<br>मु. पो. बार्शी, बालाजी निवास, आदर्शनगर,<br>ता. बार्शी, जि. सोलापूर | गेरहजर |
| ३ | **जन माहिती अधिकारी** | तालुका कृषि अधिकारी, बार्शी,<br>जि. सोलापूर | हजर |
| ४ | **अपिलीय प्राधिकारी** | उप, विभागीय कृषि अधिकारी<br>कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. नितीन अरूण क़ाळे यांनी दि. १ जाने. २००५ ते जून २००५ अखेर तालुका कृषि अधिकारी कार्यालयामार्फत बार्शी पांगरी, गौडगांव, पानगाव, वैराग मंडळाने केलेल्या रोजगार हमी योजनेच्या कामाच्या हजेरी पत्रकाच्या साक्षांकित प्रती जन माहिती अधिकारी तालुका तथा कृषि अधिकारी, बार्शी यांच्याकडे मागितल्या होत्या.

आपण दारिद्रयरेषेखाली असल्याबाबतच्या कागदपत्राची पूर्तता करू शकत नसल्याने व मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता नसल्याने उपोषण व राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील मागे घेत असल्याचे अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांना दि. २५/०१/२००८ च्या निवेदनाव्दारे कळविले माहिती मिळाली असून तक्रार राहिलेली नसल्याचे दिनांक नसलेले पत्र अपीलकर्त्याचे म्हणून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सादर केले. आयोगाने त्याबाबत विचारणा केली असता अपीलकर्त्याने तक्रार राहिली नसल्याचे दि. २५/०८/२००८ च्या पत्रान्वये कळविले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.१६.१०.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ११.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| [illegible] | अपील क्रमांक | अपील-कर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नाव | अपिलीय प्राधिकारी यांचे नाव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| [illegible] | ६०२ + ६०३ / पुणे | श्री. मामासो ऊर्फ संभाजी मधुकर चव्हाण मु.पो.रेडणी, ता. इंदापूर, जि. पुणे | ग्रामसेवक, ग्रामपंचायत, रेडणी, ता. इंदापूर, जि. पुणे | विस्तार अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर | मौजे रेडणी, ता. इंदापूर येथील दलित वस्तीमध्ये सौर दिप बसविला नसलेबाबत तक्रारी स्वरूपीय अर्जान्वये माहिती मिळावी म्हणून कार्वाईचा तपशील मागितला होता. | अपीलकर्ता गैरहजर. अपिलीय प्राधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत दि. १३.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाला केलेल्या अहवालाची प्रत अपील-कर्त्यास दिल्याचे कळविले. मूळ मागणी ही प्रशासकीय कार्यवाहीचा विषय असून माहितीचा अधिकार अधि नियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| [illegible] | ६०४ / पुणे | श्री. मामासो ऊर्फ संभाजी मधुकर चव्हाण मु.पो.रेडणी, ता. इंदापूर, जि. पुणे | माहिती अधिकारी समाज कल्याण, विभाग, जिल्हा परिषद, पुणे | समाज कल्याण अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर | मौजे रेडणी ग्राम पंचायतीच्या पाणी पुरवठ्यात १० विंधन विहिरी मंजूर झाल्या होत्या. बोअर्स कोठे कोठे घेतल्या, त्या-साठी येणारा निधी ठेकेदारास कशा पध्दतीने दिला जातो, व बोअरवर किती दिवसात हात पंप बसविला जातो, या संबंधी तपशील | अपीलकर्ता गैरहजर. अपीलकर्त्याची मागणी जन माहिती अधिकारी व प्रभारी अपिलीय प्राधिकारी यांचे विभागाशी संबंधित नाही. मात्र अपीलकर्त्यास कनिष्ठ अभियंता यांनी दि. २१.९.२००६ रोजी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांना उद्देशून लिहिलेल्या पत्राची प्रत दिली असून अपीलकर्त्याने कनिष्ठ अभियंता, इंदापूर यांचा अहवाल मान्य केला. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६९९/ पुणे | श्री. मामासो ऊर्फ संभाजी मधुकर चव्हाण मु.पो.रेडणी, ता. इंदापूर, जि. पुणे | कक्ष अधिकारी, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, पुणे | समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, पुणे | मौजे रेडणी, ता. इंदापूर येथील दलित वस्तीमध्ये सौर दिप बसविला नसले बाबत तक्रारी स्वरूपीय अर्जान्वये माहिती मिळावी म्हणून कारवाईचा तपशील मागितला होता. | अपीलकर्ता गैरहजर. जन माहिती अधिकारी यांनी दि. ११.६.२००७ अन्वये केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दिला. मूळ मागणी ही प्रशासकीय कार्यवाहीचा विषय असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

वर नमूद केलेली अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. १९ .९.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि. २२.८.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नाव | अपिलीय प्राधिकारी यांचे - नाव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ६१ +८३ / सातारा | श्री. रमेश ज्ञानदेव लोखंडे मु.पो. [illegible], ता.जि.सातारा | अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे विभाग, पुणे | अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे विभाग, पुणे | सन १९८० ते सन २००६ दि. ३१.१०.२००६ अखेर पडताळणी करण्यात आलेल्या जाती दाखल्याची संक्षिप्त नोंद उपलब्ध असलेल्या नोंदवहीची छायांकित प्रत मिळणे बाबत माहिती | माहिती बाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |
| २ | २१०/ सातारा | श्री. बादशहा हुसेन मुलाणी, मु.पो. वडूज, ता. खटाव, जि.सातारा | सरव्यवस्थापक, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. सदर बाजार, सातारा. | जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, सातारा | सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून मागणी केलेल्या माहितीचे शुल्क भरून माहिती घेऊन जाणेचे कळविले बद्दल | माहिती बाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |
| ३ | २११/ सातारा | श्री. बादशहा हुसेन मुलाणी, मु.पो. वडूज, ता. खटाव, जि.सातारा | जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, सातारा | विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग, जि. कोल्हापूर | मा. राष्ट्रपती यांचेकडे पाठविलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाही बाबत व इतर ७ मुद्दयांवरील माहिती | माहिती बाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | २१४/ सातारा | श्री. बादशहा हुसेन मुलाणी, मु.पो. वडुज, ता. खटाव, जि.सातारा | सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, वडूज, ता. खटाव, जि. सातारा. | जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, सातारा | मा. राष्ट्रपती यांचेकडे पाठविलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाही बाबत तसेच पाडेगाव संस्थेत गैरव्यवहार व ताळेबंद बदलाबाबतची माहिती | माहिती बाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |
| ५ | २६९/ सातारा | श्री. शिवाजी जगन्नाथ वाडेकर, "ओंकार" ३१, अंजली कॉलनी, गेंडामाळ, शाहू-पूरी, सातारा-४१५००२ | दुग्ध शाळा व्यवस्थापक, शासकीय दुग्ध योजना, सी-३, एम.आय.डी.सी. एरिया, सातारा | प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, कॉमन वेल्थ इमारत, लक्ष्मी पथ, पुणे-३० | शासकीय दुध योजना, सातारा येथील देख-भालीसाठी किती कर्मचारी पाठविले त्या पत्राची प्रत व तद्अनुषंगिक इतर ०३ मुद्दयांची माहिती | माहिती बाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |
| ६ | ३०९/ सातारा | श्री. मच्छिंद्र शंकर भोसले मु.पो. सुर्ली, ता. कोरेगाव, जि. सातारा | सातारा जिल्हा मध्यवर्ती बँक लि. रहिमतपूर शाखा, ता. कोरेगाव, जि. सातारा | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कोरेगाव, ता. कोरेगाव, जिल्हा सातारा | बँकेचे धोरणानुसार जास्त पेमेंट दिले तसेच शेतकरी निवास कंन्स्ट्रक्शन प्रकरणी किती हप्ते दिले व निकाल अधिकारी यांचा जिल्हा व्हिजीट अहवाल मिळाला नाही, इत्यादी बाबतची माहिती | माहिती बाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |
| ७ | २७०/ सातारा | श्री. शिवाजी जगन्नाथ वाडेकर, "ओंकार" ३१, अंजली कॉलनी, गेंडामाळ, शाहूपूरी, सातारा-४१५००२ | दुग्ध शाळा व्यवस्थापक, शासकीय दुग्ध योजाा, सी-३, एम.आय.डी.सी. एरिया, सातारा | प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, कॉमा वेल्थ इमारत, लक्ष्मी पथ, पुणे-३० | नमुना करांना निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार सुधारित वेतनश्रेणीच्या आदेशाची प्रत व इतर पाच मुद्दयांवरील माहिती | माहिती बाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |

विशेष अपील निर्गत कार्यक्रमामध्ये दि. २२.०८.२००८ रोजी वर नमूद केलेल्या अपिलांचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी परस्परांशी विचारविनिमय करुन अपेक्षित माहितीबाबत निष्कर्ष नमूद करावा असे या कार्यक्रमाचे स्वरुप आहे. त्यानुसार या घटकांमधील चर्चेअंती माहितीबाबत एकमत होऊन अपील निकाली काढण्याबाबत उभय बाजूंचे एकमत

झाल्याचे प्रपत्रात लेखी नमूद केले आहे. चर्चेअंतीचा निष्कर्ष नोंदवून त्यानुसार कार्यवाहीचे आदेश देऊन ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**आदेश**

वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ०६ .९.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. राजकुमार अर्जुन वाडकर
मु.पो. कासेगाव, ता. दक्षिण सोलापूर
जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी**
उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६२६ / सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.९.२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.९.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०.१०.२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>सन १९९९ ते मे २००७ या कालावधीत शाळेची मूळ मान्यता, उप संचालक, शिक्षण संचालनालय, पुणे यांनी दिलेली परवानगी वर्ग व तुकडी अनुदान, तसेच मुख्याध्यापक, संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी पाठविलेले प्रस्ताव व पत्रव्यवहाराच्या सत्य प्रती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. राजकुमार अर्जुन वाडकर यांनी सन १९९९ ते माहे मे २००७ पर्यंतची संस्थेच्या मूळ मान्यतेची प्रत, उपसंचालक, शिक्षण संचालनालय, पुणे यांनी दिलेली परवानगी वर्ग व तुकडी

अनुदान, तसेच मुख्याध्यापक, संस्थेच्या पदाधिकारी यांनी पाठविलेले प्रस्ताव व पत्रव्यवहार याबाबतच्या प्रती मागितल्या होत्या.

प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. दरम्यानच्या काळात आवश्यक ती माहिती प्राप्त झालेली असल्याने आपले अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दि. ११.९.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २६.९.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. शशिकांत नारायण वसगडेकर
अमीत अपार्टमेंट, सांभारे रोड,
गावभाग, सांगली - ४१६ ४१६ अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा
अधीक्षक अभियंता, सांगली पाटबंधारे मंडळ,
जि. सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी**
कार्यकारी अभियंता, सांगली पाटबंधारे मंडळ,
जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६५० / सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.३.२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.४.२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.५.२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ९.६.२००८ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** करड-वसगडे दरम्यान झालेल्या कृष्णा कालव्यासाठी १९७२ पासून आज अखेर भूसंपादन, कालवा खुदाई, कालवा दुरूस्ती, आस्थापना व इतर अशासकीय खर्चा संबंधीची माहिती. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. शशिकांत नारायण वसगडेकर यांनी कराड ते वसगडे दरम्यानच्या कृष्णा कालव्यासाठी १९७२ पासून आज अखेर भूसंपादन कालवा खुदाई, कालवा दुरूस्ती, आस्थापना व इतर अशासकीय खर्चाची माहिती मागितली होती.

अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली यांनी उपलब्ध करून दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली यांच्याकडे अपील दाखल केले होते. प्रकरणी सर्व उपलब्ध कागदपत्रांची पाहणी केली असता प्रथम अपिलामध्ये अपीलकर्त्यास सुनावणी देण्यात आली आहे. मागणी केलेल्या माहितीच्या विस्तृत स्वरूपानुसार जन माहिती अधिकारी यांनी शक्य ती सर्व माहिती अपीलकर्त्यास दिली असल्याचे अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले आहे. अपीलकर्त्याच्या म्हणण्याप्रमाणे काही माहिती राहिली असल्यास अभिलेख अवलोकन करण्याची सूचना अपिलीय प्राधिकाऱ्यांनी केली आहे, ती रास्त आहे.

अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली यांनी दि. ९.६.२००८ रोजी या प्रकरणी दिलेला निर्णय आयोग कायम करीत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ११.९.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.किसन बाबुराव भेगडे
८२, शनिवार पेठ, भेगडे आळी
तळेगाव दाभाडे, ता.मावळ,
जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
आयुक्त व प्रादेशिक संचालक
नगरपालिका प्रशासन यांचे कार्यालय,पुणे-१

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी, तळेगांव नगरपरिषद
तळेगाव दाभाडे, ता.मावळ,जि.पुणे

| अपील क्रमांक ६९७/पुणे | जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपीलाची तारीख | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| | २८.०६.२०००६ | २५.०७.२००६ | १८.०९.२००६ | ०६.०१.२००७ |

मूळ अर्जात मागणी केलेली माहिती सन २०००-२००१ या कालावधीसाठी विशेष कर वसुली काम केले असून एक अतिरिक्त वेतनवाढ देणेबाबतचा प्रस्ताव अशी माहिती मागितलेली होती.

## विवेचन

अपीलकर्ता श्री.किसन बाबुराव भेगडे यांनी 'सन २०००-२००१ या कालावधीमध्ये विशेष कर वसुली काम केले, म्हणून एक अतिरिक्त वेतनवाढ देणे बाबतचा प्रस्ताव' अशी माहिती मागितली होती. त्यावरुन माहिती कोणती याचा बोध होत नाही. ठराविक ६ कर्मचाऱ्यांना वेतनवाढ दिली व ७ कर्मचाऱ्यांना दिली नाही, याची कारणे त्यांनी विचारली होती. श्री.भेगडे यांच्या मूळ अर्जाप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, तळेगांव नगरपरिषद तळेगाव दाभाडे, ता.मावळ,जि.पुणे यांनी माहिती उपलब्ध करुन दिली. अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) ,

आयुक्त व प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन यांचे कार्यालय,पुणे-१ यांनी अपील फेटाळले. या विरुध्द श्री.भेगडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

अपीलकर्त्यांची मूळ मागणी अतिरिक्त वेतनवाढ मिळण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देणे ही आहे. तसेच कार्यवाहीबाबत खुलासा विचारला आहे. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही. मात्र संबंधित विषयाबाबतच्या कार्यवाहीची पूर्ण माहिती त्यांना दिली गेली पाहिजे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१) अपील अमान्य
२) श्री.भेगडे यांच्या अतिरिक्त वेतनवाढीच्या व वेतनवाढ न दिलेल्या ७ कर्मचाऱ्यांबाबतच्या प्रस्तावावरील कार्यवाहीबाबतची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास १५ दिवसात द्यावी. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, तळेगांव नगरपरिषद तळेगाव दाभाडे, ता.मावळ,जि.पुणे यांनी अनुपालन अहवाल दि.२५.०९.२००८ पर्यंत आयोगास सादर करावा.

पुणे
दि. १० /०९/२००८

माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ